# जाहिरात

सन २०११-१२ या वर्षात राज्यस्तर योजनेअंतर्गत अर्थसहाय्यामधून आदिवासी विकास विभागामार्फत नागपूर विभागातील **"अनुसूचित जमातीच्या मुलींना विमान सेवेत हवाई सुंदरीचे प्रशिक्षण देणे व मुलांकरीता विमानसेवत हवाई सेवकाचे प्रशिक्षण"** ही योजना राबविण्यांत येत आहे. सदर योजनेचा कालावधी एक वर्षाचा राहील. त्याअनुषंगाने वरील प्रशिक्षण देणा-या व खालील बाबीची पूर्तता करणा-यां इच्छूक नामांकित स्वयंसेवी संस्थाकडून प्रस्ताव मागविण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| १ | **संस्था नोंदणीकृत व पंजीकृत असावी..** |
| २ | **सदरचे प्रशिक्षणास केद्र शासन, राज्य शासन अथवा प्राधिकरणाची मान्यता असावी.** |
| ३ | **सदरचे प्रशिक्षण राज्य/ केद्र शासनाचे शासनमान्य संस्थेस सलग्न असणे आवश्यक आहे.** |
| ४ | **संस्थेचे आर्थिक व्यवहार कमीत कमी रू. ५००..०० लक्ष (५ कोटी ) वार्षिक उलाढाल असणे आवश्यक आहे.** |
| ५ | **प्रशिक्षण संस्थेची निवड झाल्यानंतर संपूर्ण योजनेतील रकमेच्या किमान १० टक्के रकमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी देणे (हमीपत्र) आवश्यक आहे.** |
| ६ | **मागील ३ वर्षाचे अंकेक्षण अहवाल अद्यावत जोडणे आवश्यक आहे.** |
| ७ | **सन २०१०-११ या वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.** |
| ८ | **संस्थेकडे स्वतःची इमारत उपलब्ध असावी.** |
| ९ | **संस्थेस सदरच्या प्रशिक्षणाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.** |
| १० | **सदरची संस्था किमान ५ वर्ष जुनी असावी. तसेच मागील ५ वर्षात दिलेल्या प्रशिक्षणाचा निकाल सोबत जोडणे आवश्यक आहे.** |
| ११ | **प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना नौकरीची हमी देणेबाबतचे हमीपत्र आवश्यक आहे.** |
| १२ | **संस्थेकडे प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षित असा प्रशिक्षक वर्ग (ज्यांचे नियुक्तीस शासनमान्य संस्थेकडून नियमित मान्यता देण्यात आली आहे असे कर्मचारी) त्याचे नियुक्ती आदेश तसेच कर्मचारी वृदांची तपशिलासह माहिती सोबत जोडणे आवश्यक आहे.** |
| १३ | **प्रशिक्षणाकरीता आवश्यक असे प्रशिक्षण साहीत्याची यादी सोबत जोडावी.** |
| १४ | **प्रशिक्षणाबाबत अभ्यासक्रमाचा तपशिल सोबत जोडणे आवश्यक आहे.** |
| १५ | **सदरच्या विमान क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्थाशी/कंपन्या सोबत Tie-ups असल्याबाबतचा पुरावा सादर करणे बंधकारक राहील.** |
| १६ | **प्रशिक्षणार्थीकरीता प्रशिक्षणासाठी तसेच मुला-मुलींसाठी राहण्याची व भोजनासाठी स्वंतत्र व्यवस्था आवश्यक आहे. तसेच इतर सोयीसुविधाची माहिती सोबत जोडावी.** |
| १७ | **प्रशिक्षणाचा सर्व खर्च (ज्यामध्ये भोजन, निवास, गणवेश (एक) सोंदर्यप्रसाधन किट्, विमा, शौक्षणिक प्रशिक्षण साहित्य,परिक्षा शुल्क,स्वगांव ते प्रशिक्षण संस्था जाणे-येणे खर्च एक वेळा,वैद्यकिय खर्च इत्यादीचा समावेश राहील.प्रशिक्षण व निवास व्यवस्था दरम्यान ये-जा करण्याचा खर्च देखाल वरील रकमेत अंतर्भूत राहील.)मिळून एकूण फी बाबतचा तपशिल सोबत जोडावा.** |
| १८ | **प्रशिक्षणाचा खर्च ३ टप्प्यात देण्यांत येईल. याबाबत संस्थेने हमीपत्र करून देणे बधनकारक राहील.** |
| १९ | **निवड झालेल्या संस्थेस योजनेच्या अमलबजावणी संदर्भात वेळोवेळी निर्गमित झालेल्या अथवा होणा-या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा करून दयावा लागेल.** |
| २० | **प्रस्ताव नाकारण्याचे अथवा स्विकारण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेले आहे.** |

तरी वरील प्रमाणे पूर्तता करीत असलेल्या इच्छूक स्वयंसेवी संस्थानी परिपूर्ण आवश्यक दस्ताऐवजासह व फोटोग्राफसह स्वतंत्र प्रस्ताव दिनांक १० /०९ /२०११ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) या कार्यालयात सादर करावा. विहीत केलेल्या कालावधीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करण्यात येणार नाही .याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरी /-

**(अन्शु सिन्हा)**

अपर आयुक्त

आदिवासी विकास,नागपूर

# अपर आयुक्त, आदिवासी विकास,नागपूर.

आदिवासी विकास भवन, गिरीपेठ,अमरावती रोड,आर.टी.ओ.ऑफीस समोर, नागपूर.४४००१०
दुरध्वनी क्र.(०७१२) २५६०१२७ , २५६०३१४, २५५३०८३ फॅक्स क्र.२५६५००८
e-mail-atcnagpur@yahoo.co.in

क्र.विकास-२०११/प्र.क्र.१०/का-२(४)/५०९६
दिनांक :-

प्रति,
संचालक,(माहिती)
माहिती जनसंपर्क संचालनालय,
जुने सचिवालय, इमारत
नागपूर.

**विषय :- जाहीरात प्रसिध्द करणेबाबत . . . .**

आदिवासी विकास विभागातंर्गत राज्य योजनेतर्गत नागपूर विभागातील अनुसूचित जमातीच्या मुलींना विमान सेवेत हवाई सुदरीचे प्रशिक्षण देणे व मुलांसाठी विमान सेवेत हवाई सेवक (कॅबीन-क्रयु) या विषयाचे प्रशिक्षण देण्याचे विचाराधिन आहे. **त्यासाठी नागपूर विभातील इच्छूक व पात्र नामांकित संस्थाकडून प्रस्ताव प्राप्त करून घेण्यांत येत आहे.**

२. तरी आपणांस विनंती करण्यांत येते की, नागपूर विभागातंर्गत सर्व जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना वरील योजनेचा लाभ होण्याच्या दृष्टीने सोबतच्या मसुद्या प्रमणे विभागीयस्तरावरील अग्रगण्य मराठी दैनिक वृत्तपत्रात दिनांक १९ /०८ /२०११ पर्यंत जाहिरात प्रसिघ्द करण्यांत यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नांव | कार्यालय,अपर आयुक्त,आदिवासी विकास,गिरीपेठ अमरावतीरोड, नागपूर. |
| २. | कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक | (०७१२) २५६०१२७ , २५६०३१४, २५५३०८३ फॅक्स क्र.२५६५००८ |
| ३. | जाहिरातीचे स्वरूप | जाहिर सूचना |
| ४. | प्रसिध्दीचे क्षेत्र | जिल्हा -नागपूर /वर्धा /गोंदिया/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली. |
| ५. | कोणत्या वृत्तपत्रात प्रसिध्दी द्यावी | (विभागीयस्तर) मराठी माध्यम ज्यास्तीत ज्यास्त खपाच्या वृत्तनत्रात जाहिरात प्रसिध्द करावी. |
| ६ | जाहिरातीचे देयक कोणस सादर करावीत. | अपर आयुक्त,आदिवासी विकास,नागपूर. |

<u>स्थळप्रतिवर मा.अपर आयुक्त,महोदयांची स्वाक्षरी आहे.</u>

स्पाक्षरी /-
अपर आयुक्त
आदिवासी विकास,नागपूरकरिता